महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम

**Government Medical College, Washim**

Email :deangmcwashim@gmail.com Website www.gmcwashim.in

जा.क्र. शावैमवाशिम/आस्था १,२/जाहीरात / ५०१४-२२ /२०२५ दि. २३/१२/२०२५

**विषय :-** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम येथील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी यांचे पदे कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात एकत्रित मानधनावर ३६४ दिवसाकरिता भरण्याबाबत...

**संदर्भ:-**१. शासन निर्णय क्र.- ई १०१६१६२/२०२५ वैसेवा-३ दिनांक ०६ मार्च २०२५
२. शासन निर्णय क्र. पदनि-२०२३/प्र.क्र.१७४/२३/वैसेवा-२ दिनांक ०६ मार्च २०२४
३.शासन निर्णय क्रमांक :एलईसी-१४२४/प्रक्र.२२८वैसेवा-३ दि.१८ जूलै २०२४
४.शासन निर्णय क्र वेतनी -२०१९ /प्र.क्र.०३/२०१९वैसेवा -२ दिनांक ३१.१२.२०२०

उपरोक्त विषयानुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वाशिम या संस्थेतील विविध विभागातील खालील नमूद विषयातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहाय्यक प्राध्यापक, वरिष्ठ निवासी या संवर्गातील पदे शासनातर्फे विहित मार्गाने भरेपर्यत किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत उपलब्ध होईपर्यत किंवा संचालनालयातर्फ बंधपत्रित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत या पैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत स्थानिक निवड मंडळामार्फत (DSB) ३६४ दिवसांकरीता निव्वळ तात्पूरत्या स्वरुपात प्रचलित संदर्भ क्रमांक ३ च्या शासन निर्णयानुसार व संदर्भ क्रमांक ४ मध्ये नमूद केल्याप्रमाणे एकत्रित मानधनावर भरण्याकरीता ही जाहीरात प्रसिध्द करण्यात येत आहे.

**टीप :-** वर नमूद पदाची संख्या ही कमी जास्त होउ शकते तसेच जाहीरात पूर्णतः रद्द करण्याचे सर्व अधिकार संस्था प्रमुख म्हणून अधिष्ठाता शा.वै.म. वाशिम यांच्या कडे राखीव असतील.

१.सदर जाहिरातीचा तपशील व अर्जाचा नमूना या संस्थेच्या www.gmcwashim.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला आहे.
२.अर्ज उपलब्ध होण्याची तारिख :- २३/१२/२०२५
३.अर्जाचे शुल्क :- २००/- (अर्ज सादर करतांना शुल्क प्राप्त झालेल्या उमेदवारांचेच अर्ज स्विकारले जातील)
४.अर्ज स्विकारण्याची अंतिम तारीख :- २९/१२/२०२५ (सायंकाळी ५:०० वाजेपर्यत)
५.शासकीय सुटीचे दिवस वगळून शासकीय वेळेत विहीत नमूण्यातील अर्ज या कार्यालयात प्रत्यक्ष (स्वतः) व्यक्तिशः सादर करणे आवश्यक आहे.
६.वरील सर्व पदे शासन निर्णयानुसार भरण्यात येतील
७.मूलाखतीसाठी उमेदवारांना वेगळे पत्र पाठविले जाणार नाही.
८.मूलाखतीचा दिनांक, वेळ व ठिकाण :- ०२/०१/२०२६ सकाळी ११.०० वाजता पासुन ते ०१.०० वाजेपर्यंत

**मुलाखतीचे ठिकाण मा. अधिष्ठाता कक्ष, शा.वै.म. वाशिम**

९.मूलाखतीच्या वेळेस मूळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहिल.
मूलाखतीकरीता उपस्थित राहण्याकरीता कोणत्याही प्रकारचे दैनिक भत्ता व प्रवास भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.
१०.उमेदवाराने कूठल्याही प्रकारे शिफारस पत्र जोडू नये किंवा इतर माध्यमातून शिफारस केल्यास उमेदवारास अपात्र ठरवण्यात येईल.
११.उमेदवाराने स्वतः भरलेला अर्ज योग्य कागदपत्रे जोडून व्यक्तीशः विहीत वेळेत सादर करणे आवश्यक आहे. इतर कूठल्याही पध्दतीने सादर केलेले अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाही.
१२.जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पूर्णतः रद्द करण्याचा अधिकार मा. अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे.

(डॉ.सतिन मेश्राम )
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
वाशिम

## आवश्यक शैक्षणिक अर्हता

प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक तसेच वरिष्ठ निवासी या सर्व पदांसाठी राष्ट्रीय आर्युविज्ञान आयोगाचे मानकानूसार राहतील.

## सर्वसाधारण अटी

१.वरील दर्शवीलेल्या पदसंख्येत बदल होउ शकतो.

२.वरील पदभरती निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असून त्यामुळे नियुक्त उमेदवार हे राज्य शासनाचे नियीमत कर्मचारी म्हणुन ग्राह्य धरण्यात येणार नाही.

३.एम.एस.सी.आयटी परीक्षा पास असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.

४.उमेदवारांना मूलाखतीच्या ठिकाणी स्वखर्चाने उपस्थित राहावे लागेल

५.प्रशासकीय किंवा काही कारणास्तव निवड (भरती प्रक्रिया) कोणत्याही वेळेस किंवा कोणत्याही टप्यावर थांबविण्याचा अधिकार अधिष्ठता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांना आहे.

६.निवड झालेले उमेदवार निव्वळ तात्पूरत्या कंत्राटी (करार) स्वरुपातील असल्याने ते कधीही केव्हाही कमी करण्यात येतील, त्यावर त्यांना कोणत्याही कायम स्वरुपाचा हक्क सांगता येणार नाही.

७.नियुक्ती झाल्यानंतर तसेच सेवा सुरु झाल्यानंतर कोणत्याही क्षणी कोणत्याही सबबी शिवाय कोणत्याही उमेदवारांची सेवा समाप्त करण्याचे अधिकार अधिष्ठाता,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, वाशिम यांनी राखुन ठेवले आहे.

८.अर्जा सोबत पदाकरीता आवश्यक शैक्षणिक अर्हते नुसार प्रमाणपत्र (प्रथम/द्वितीय/तृतीय वर्षाची गुणपत्रिका,पासींग सर्टीफिकेट, डिग्री अत्यावश्यक ,इतर कागदपत्रे तसेच अनूभव प्रमाणपत्र व पासपोर्ट साईज फोटो व ओळखपत्र ( टी.सी/ आधारकार्ड/ पॅन कार्ड/ ड्रायव्हींग लायसन्स/ पासपोर्ट ) यापैकी कोणतेही दोन जोडण्यात यावे. उपरोक्त कागदपत्राच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडाव्या, ( उपरोक्त सर्व कागदपत्राच्या स्वयंसाक्षांकित छायांकीत प्रति अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.)

९.मूलाखतीच्या वेळी मूळ कागदपत्रे सोबत ठेवावे मूळ कागदपत्रे सादर न करणाऱ्या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही व ते प्रक्रियेतून बाद समजले जातील.

१०. इतर संस्थेतील कार्यरत उमेदवारांनी अर्जासोबत संबंधित संस्था प्रमुखांचे ना हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

११. उमेदवारांनी धारण केलेल्या पदाचा राजीनामा दयावयाचा झाल्यास एक महिना पूर्व सुचना देणे आवश्यक आहे. अन्यथा नोटीस न देता पदाचा राजीनामा दिल्यास संबंधीतांना एक महिन्याचे वेतन/मानधन शासन तिजोरीत जमा करावे लागेल, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

१२. वरील निवड झालेल्या उमेदवारांने नेमणुक केलेल्या विभागात कर्तव्यावर उपस्थित राहणे बंधनकारक राहिल, तसेच कर्तव्याच्या ठिकाणी कामचुकारपणा,कूठलेही गैरवैर्तन आढळल्यास सदर उमेदवारांची सेवा तात्काळ रद्य करण्यात येईल.

१३. जाहिरातीत दिलेल्या जागा तात्पूरत्या कंत्राटी स्वरुपाच्या असुन कोणतेही पूर्व सुचना व कोणतेही कारण न दर्शविता सेवा तात्काळ समाप्त करण्याचे अधिकार मा. अधिष्ठाता यांना असतील.

**निवडीचे निकष प्रचलित शासन नियमानूसार पूढील प्रमाणे राहतील (प्राध्यान्यक्रम)**

१.नियमानूसार बंधपत्रीत उमेदवारास प्रथम प्राध्यान्य दिल्या जाईल

२.पात्र उमेदवारांची यादी ही पदव्युत्तर पदवी परिक्षेच्या गूणांवर ठरविण्यात येईल

३.व्हॅलिड एम. एम. सी. नोंदणी असणे आवश्यक

४.अनुभवी उमेदवारांना प्राध्यान्य दिले जाईल

टीप :- सदर जाहिराती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/ सदरची जाहिरात पूर्णतः रदद् करण्याचा अधिकार मा. आयूक्त वैद्यकीय शिक्षण व आयुष विभाग, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,मुंबई यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

(डॉ.सतिन मेश्राम )
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
वाशिम

प्रति,

१.कार्यालयीन संकेतस्थळ, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.

२.सूचना फलक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय वाशिम

प्रत माहितीस्तव -

३. मा. आयूक्त वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांना माहितीस्तव संविनय सादर.

४.मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांना माहितीस्तव संविनय सादर.

५. सर्व अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालये, महाराष्ट्र राज्य यांना सुचना फलकावर लावण्याकरीता सस्नेह सादर.

६. अधिष्ठाता यांचे स्विय सहायक, यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी अधिष्ठाता यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाप्रमाणे संकेतस्थळावरील माहिती अदयावत करावी.